विषय : म.ज.म.संहिता १९६६.

टंचाई व टंचाई सदृश स्थिती
निर्माण झालेल्या गावांमध्ये
म.ज.म.संहिता १९६६ चे कलम ७०
व त्याखालील नियम यातील
परवानगीची अट शिथिल करून
पाण्याचा मुक्त वापर करणेबाबत.

2/12/86

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शा. निर्णय क्र. डब्ल्यूटीआर १०८६/१८८५८२ [५२] ल-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० नोव्हेंबर १९८६.

शासन निर्णय :

१९८६ च्या खरीप हंगामात महाराष्ट्रातील विस्तृत प्रदेशात टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे, जाहीर झालेल्या नजर पैसेवारीवरून दिसून येते. हया टंचाई परिस्थितीच्या निवारणार्थ शासनाने विविध उपाययोजना करण्याचे ठरविले आहे.

२. म.ज.म.संहितेच्या १९६६ च्या कलम ७० अन्वये, अधिसूचित नसलेल्या नदी, नाले इत्यादिंच्या पाण्याचे दर ठरविण्याचे तसेच सदर कलमांतर्गत तयार केलेल्या नियमानुसार अशा पाण्याच्या वापराबाबत परवानगीचे अधिकार महसूल खात्याकडे आहेत.

३. शासनाने वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या उपाययोजना करण्याचे ठरविले आहे त्यातील एक भाग म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, नजर पैसेवारीनुसार ज्या गावात टंचाई सदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते अशा बाधीत गावांतील शेतक-यांना, अधिसूचीत नसलेल्या नदी, नाल्यांतून मोफत पाणी उचलण्याची मुभा देण्यात यावी व त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल [ पाणी वापरासाठी परवानगी ] नियम १९६९ मधील नियम २ अन्वये विहीत केलेली परवानगीची अट शिथील करण्यात येत आहे. सदर निर्णय अशा गावांमध्ये टंचाई परिस्थिती अस्तित्वात असेपर्यंतच अंमलात राहील. जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसिलदारांना व महसूल अधिका-यांना वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी विनाविलंब करण्याबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
23 NOV 1986

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,